# यंदा ७७ हजार विद्यार्थ्यांना पोस्टाने 'पदवी'!

## दीक्षांत समारंभाची तयारी : ३० हजार प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनामुळे शिवाजी विद्यापीठाचा ५७वा दीक्षांत समारंभ यावर्षी दि. ६ एप्रिल रोजी ऑनलाइन स्वरूपात होणार आहे. नोंदणी केलेल्या सर्व ७७,५४३ विद्यार्थ्यांना (स्नातकांना) पोस्टाच्या माध्यमातून पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि दीक्षांत विभागाकडून ऑनलाइन समारंभ आणि प्रमाणपत्र वितरित करण्याची तयारी सुरू झाली आहे. आतापर्यंत ३० हजार पदवी प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली आहे.

राज्यातील अन्य विद्यापीठांप्रमाणे शिवाजी विद्यापीठाने कोरोनामुळे यावर्षीचा दीक्षांत समारंभ ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित २९३ महाविद्यालयांमध्ये दीक्षांत समारंभ होणार नाही. यावर्षी पदवी प्रमाणपत्रासाठी विद्यापीठाकडे ७७,५४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळांच्या निर्णय आणि मान्यतेनुसार या विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे पदवी घरपोच पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी शिवदीक्षांत प्रणालीच्या माध्यमातून काम सुरू आहे. याअंतर्गत सोमवारपर्यंत ३० हजार प्रमाणपत्रांची छपाई झाली असून, ८५०० प्रमाणपत्रे लॅमिनेशन करून पाठविण्यासाठी तयार आहेत. येत्या चार दिवसांत प्रमाणपत्रांबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण होईल. विद्यापीठाच्या ऑनलाइन दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर अखिल भारतीय



तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

यावर्षी चार पीएच.डी.चे विद्यार्थी आणि राष्ट्रपती, कुलपती पदक विजेत्या अशा मोजक्या सहा विद्यार्थ्यांना राजभवनमध्ये कुलपतींच्या हस्ते पदवी, पदक प्रदान करून त्याची चित्रफीत ऑनलाइन समारंभामध्ये दाखविण्याचे नियोजन विद्यापीठाने केले असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सोमवारी दिली.

### 'कोरोना'ची धास्ती

राज्यात कोरोनाची रुग्णसंख्या वाढत आहे. त्यामुळे या समारंभाची तयारी कोरोनाच्या धास्तीखाली सुरू आहे. राजभवनात मोजक्या विद्यार्थ्यांना पदवी, पदक प्रत्यक्षात प्रदान करण्याच्या कार्यक्रमाबाबत राजभवनाच्या आदेशानुसार कार्यवाही केली जाणार आहे.

### ७१ हजार जणांचा ऑनलाइन पर्याय

परीक्षा मंडळाने केलेल्या आवाहनानुसार गेल्या दीड आठवड्यांपूर्वी ६१ हजार विद्यार्थ्यांनी हिवाळी सत्रातील परीक्षा देण्यासाठी ऑनलाइन पर्याय निवडला होता. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने ऑफलाइनमधील दहा हजार जणांनी गेल्या आठवड्यात ऑनलाइन पर्याय निवडला आहे.

3 0 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# होस्टेल्स बांधकामासाठी भरघोस तरतूद

## शिवाजी विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर : विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता येणार

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी होस्टेल्स बांधण्यासाठी अधिकची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये राहून शिक्षण घेता येणार आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरणामध्ये शिक्षण घेता येणार आहे.



कोल्हापूरसह सांगली आणि सातारा हे तीन जिल्हे शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे; मात्र विद्यापीठातील गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे राज्याच्या तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात, तर अलीकडील काही वर्षांत परदेशी विद्यार्थ्यांचाही ओढा वाढत आहे.

बाहेरून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा कल विद्यापीठाच्या होस्टेलमध्ये राहण्याकडे असतो; मात्र विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन विद्यापीठातील होस्टेल्सच्या संख्येमध्ये वाढ करण्यात येणार आहे. त्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### ३८ परदेशी विद्यार्थी

सध्या विद्यापीठात ३८ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यांच्यासाठी विशेष हॉस्टेलची निर्मिती पाच बंगला परिसरात यापूर्वीच करण्यात आली आहे. या होस्टेलमध्ये विविध सुविधा निर्माण करण्यासाठी ४१ लाख रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे. सुसज्ज आणि सुविधायुक्त होटेल्समुळे परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे.

### अधिकाधिक विद्यार्थी कॅम्पसवर

*विद्यापीठात शिक्षण घेणारे अधिकाधिक शिक्षण घेणारे विद्यार्थी विद्यापीठाच्या कॅम्पसवर राहावेत असा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या होस्टेल्सची संख्या वाढणे गरजेचे होतेच, तर परदेशी विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यांच्या होस्टेलसाठीही तरतूद करण्यात आली आहे.*

**- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

### यासाठी तरतूद

विद्यार्थिनी वसतिगृहाकरिता एकूण १ कोटी ३९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये वसतिगृह दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. विद्यार्थी वसतिगृहाकरिता एकूण २ कोटी ६६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये वसतिगृह दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. यात नवीन वसतिगृह बांधकामासाठीच्या १ कोटी १० लाख इतक्या तरतुदीचा समावेश आहे. कमवा व शिका मुलींचे वसतिगृह नव्याने बांधण्यात आले असून, त्यामध्ये सोयी-सुविधा व दैनंदिन खर्चाकरिता १० लाख ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रिसर्च स्कॉलर होस्टेल पूर्णत्वाकडे आले असून, काही प्रलंबित कामांसाठी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.